I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 197-200
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# उत्पादन घटकावर लॉकडाऊनचा परिणाम

A. R. Meshram
Gondwana University Gadchiroli
*Corresponding Author: archanamshrm@gmail.com

**ABSTRACT:**

**Key words: -**

संपूर्ण जगात कोरोना (कोविड 19) या महामारीने हाहाकार माजवला आहे. जगातील महासत्ता ओळखल्या जाणाऱ्या अमेरिकेला सुध्दा सोडले नाही. सर्वात जास्त कोविड 19 या महामारीचे रूग्ण अमेरिकेत आहेत. कोविड 19 हा असा संसर्गजन्य रोग आहे की, जागतिक संपर्कामुळे तो जास्तीत जास्त पसरायला लागला. चीन मधील वृहानमधून उद्‌भवून त्यांने संपूर्ण जग काबीज केले. जगात सध्या कोविड 19 या महामारीचे 85,20924 रुग्ण आहेत. पुढील आकडेवारीवरुन हे स्पष्ट होते.

भारताचा जागतिक कोविड 19 महामारीच्या यादीत 4 था क्रमांक असून या महामारीने साडेतीन लाखापेक्षा जास्त लोकांना संक्रमित केलेले आहे. व 12 हजारापेक्षा जास्त मृत्यू झालेले आहेत. ही आकडेवारी दिनांक 18 जून 2020 ची आहे. भारतात 18 मार्च ते 18 जून या 3 महिन्याच्या कालावधीत कोरोना रुग्नांची संख्या वाढल्याचे दिसून येते.

जगातील अनेक देशावर कोविड 19 या महमहारीने अतिक्रमण केले आहे. या महामारीपासून देशातील लोकांचे संरक्षण करण्याकरीता जागतिक संपर्क टाळण्याकरीता आणि महारोगावर नियंत्रण आणण्याकरीता लॉकडाऊनशिवाय दुसरा पर्याय उरला नाही. आज संपूर्ण जगात लॉकडाऊन केल्यामुळे त्याचे परिणाम संपूर्ण जगातील अर्थव्यवस्थेला भोगावे लागले आहे. कारण जागतिकीकरणामुळे संपूर्ण देश एकमेकांवर कच्चा माल आणि पक्का मालावर अवलंबून आहेत. जागतिकीकरणामुळे उत्पादन घटकांची संपूर्ण जागात देवाणघेवाण केली जाते आणि ही आयात निर्यातीतून होणारा सपर्क रोखण्यासाठी व महामारीच्या नियंत्रणासाठी लॉकडाऊन घोषित करण्यात आले.

लॉकडाऊनचा शाब्दीक अर्थ आहे तालाबंदी, ज्याप्रकारे एखादया (फॅक्ट्रीला) कारखान्याला बंद केलं जातं तेथे तालाबंदी केल्यामुळे कोणी आत जाऊ शकत नाही. त्याचप्रमाणे लॉकडाऊनचा निर्णय दूर्मिळ प्रसंगी लोकांचा जिविताची काळजी घेण्यासाठीच घेतला जातो. युध्द, साथीचे आजार आणि आणिबाणी अशाप्रसंगी लॉकडाऊन करतात. लॉकडाऊन प्रसंगी लोकांना घरातून बाहेर पडण्यास मनाई असते. केवळ धान्य, औषधी, भाज्या अशा गरजेच्या वस्तुसाठीच बाहेर पडण्याची परवानगी असते. लॉडाऊनमध्ये जीवनावश्यक वस्तू आणि सेवा वगळता सर्व सवो बंद ठेवण्यात येतात. लॉकडाऊचा अवलंब केल्यामुळे भारतातील कोराना रुग्नाची संख्या जागतिक वाढीपेक्षा कमी वेगाने वाढली आणि जागतिक मृत्यूपेक्षा भारतातील मृत्यूदर कमी वाढला.

भारतात पहिला लॉकडाऊन 23 मार्च ला घोषीत करण्यात आला, त्यामुळे रेल्वेगाडया बसेस कारखाने उदयोगधंदे, व्यापार, व्यवसाय, खाजगी कार्यालये सर्वच बंद पडले. त्यामुळे उत्पादनाचा महत्वाचा घटक असलेला श्रमिक सुध्दा घरी बसला. भारतात 80 टक्क्याहुन जास्त लोक असंघटित क्षेत्रात काम करतात. रोजंदारीवर काम केल्यास रात्री चूल पेटेल अशी स्थिती असणारे कोटयावधी कामगार आपल्या देशात आहेत. रोज कमावणे व खाणे अशी दिनचर्या असणाऱ्या मजुरांच्या हाल अपेष्टा झाल्या. लॉकडाऊनच्या परिस्थितीमध्ये त्यांना गावी जाता येत नाही व पोटाला अन्न मिळत नाही. प्रशासनाकडून जरी

जेवणाची, धान्याची सोयी सुविधा पुरविण्यात येत असल्या तरी त्या अपुऱ्या आहेत. CMIE चा रिपोर्टनुसार (सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनामी) लॉकडाऊनमुळे 20 एप्रिलपर्यंत 14 करोड लोकांच्या नौकऱ्या गेल्या. CTI (कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री ) च्या रिपोर्टनुसार 15 मे पर्यंत 30 करोड लोकांच्या नौकऱ्या गेलेल्या आहेत. 137 करोड लोकांमधून 16 वर्षापेक्षा जास्त असणाऱ्या लोकांची संख्या 100 करोड आहे. 100 करोडमधून 30 करोड लोकांच्या नौकऱ्या गेल्यामूळे 30 टक्के देश बेरोजगार झाला. अशा अवस्थेत मिळेल त्या साधनाने, पायी प्रवास करुन मजूर आपआपल्या गावाच्या राज्याच्या दिशेने निघाला. या प्रवासात अनेकांना उपासमारीमुळे, अपघातामुळे, अत्याचारामुळे पायपीट असहय झाल्याने प्राणास मुकावे लागले. अनेक मजूर स्त्रियांचे बाळंतपण वाटेतच झाले. लहान चिमुकल्यांना घेऊन हा प्रवास एक–दिड महिना चालू होता. त्यानंतरचे मजूरांचे हालअपेष्टा रोखण्यासाठी सरकारने श्रमिक रेल्वेगाडया चालू केल्या. काही सेवाभावी संघटनेने, काही समाजसेवकाने आपल्या खर्चातून मजुरांची जाण्याची व्यवस्था केली. जास्तीत जास्त श्रमिक हे बिहार, झारखंड, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओरिसा आणि राजस्थान मधून आलेले होते. या राज्यातील 116 जिल्हयामधून आलेल्या मजूरांची संख्या जास्त आहे.

हवा, पाणी, जमीन, डोंगर, खाणी, जंगले या सर्व प्रकारच्या नैसर्गिक सामग्रीचा समावेश भूमी या घटकात होतो. भूमिशिवाय कोणत्याही वस्तूचे उत्पादन शक्य नसते. लॉकडाऊनच्या काळात उदयोगधंदे, वाहतूक बंद असल्याने, भूमीचा वापर सुध्दा बंद झाला. महाराष्ट्र राज्य हे देशातील प्रमुख औदयोगिक राज्य आहे. देशातील एकुण कारखान्याचा 15 टक्के कारखाने महाराष्ट्र राज्यात आहेत. 2010 अखेर कारखान्याची संख्या 42187 असून त्यात काम करणाऱ्या श्रमिकांची संख्या 2285537 इतकी आहे.

सन 2018 च्या आकडेवारीनुसार देशात, 237684 एकूण कारखाने आहेत. हे सर्व कारखाने लॉकडाऊनच्या काळात बंद असल्याने याचा फटका उत्पादनाच्या भूमी या घटकावर बसला. भुमी मालकावर लॉकडाऊनचा फटका बसला. काही भूमी सरकारची आहे. त्यामुळे याचा फटका सरकारच्या तिजोरीवर बसला.

उत्पादनाचा तिसरा घटक भांडवल होय. केवळ पैसा म्हणजे भांडवल नव्हे तर उत्पादनास सहाय्यभूत असणारी अवजारे व आयुधे, यंत्रे ही भांडवली सामुग्री आहे. लॉकडाऊनच्या भांडवलावर सुध्दा विपरित परिणाम पडला. उदयोग बंद, काम बंद, मजुरी बंद, त्यामुळे बचत बंद आणि बचत नसल्याने गुंतवणुक बंद त्यामुळे भांडवल सुध्दा बंद पडले. अलीकडच्या काळात भौतिक भांडवलाबरोबर मानवी भांडवलावरही भर देण्यात येतो. मानवी भांडवल म्हणजे सुशिक्षीत, प्रशिक्षित व निरोगी मनुष्यबळ. परंतु लॉकडाऊनमुळे संपूर्ण भांडवल निरुपयोगी बनले. त्यामुळे त्यांचा फटका भांडवलदारास बसला.

ब्रिटीश ब्रोकरेज कर्म बार्कलेज च्या नुसार 3 मे पर्यंत लॉकडाऊनमध्ये 234.4 अरब अमेरिकी डॉलरचा आर्थिक नुकसान झाला. आर्थिक वृध्दी 2020 मध्ये शुन्य होईल. 2020–21 मध्ये 0.8 टक्के वृध्दी होईल.

उत्पादनाचा चवथा घटक संयोजक किंवा संघटक आहे. भूमी, श्रम, भांडवल या उत्पादन घटकाची जुळवाजुळव करुन उत्पादनाचे निर्णय घेण्यापासून त्यांची अंमलबजावणी करण्यापर्यंतची जबाबदारी पार पाडणारा संघटक हा चवथा स्वतंत्र घटक समजला जातो. उत्पादन बंद पडल्याने संपूर्ण जोखमिचा सामना संयोजकाला करावा लागला. तो उत्पादनाचे निर्णय घेऊ शकला नाही आणि झालेले उत्पादन ग्राहकापर्यंत पोहचवता आले नाही. एप्रिल मध्ये ब्ध नुसार लॉकडाऊनचा परिणाम विक्रिवर 37 टक्के घट झाली. उत्पादन 27 टक्के घटले आणि पुरवठा साखळी 24 टक्के ने घटली.

लॉकडाऊनचा परिणाम उत्पादनाच्या चारही घटकावर बसला. या चारही घटकात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरितया मानव असल्याने मानवी जीवन उद्धस्त झाले. पण लॉकडाऊन हे मानवाचे जीवन वाचविण्यासाठीय करण्यात आले जोपर्यंत लॉकडाऊन कठोर होते तोपर्यंत कोरोनाचा प्रसार कमी होता. परंतु लॉकडाऊन 22 मे आणि 1 जुन पासून शिथील

करण्यात आले त्यामुळे कोरोना रुग्नांच्या संख्येत झपाटयाने वाढ होत आहे.

22 मे पासून लॉकडाऊन शिथील केल्यामुळे कोराना रुग्नांच्या संख्येत वाढ दुपट्टीने झाल्याचे दिसून येत आहे. श्रमिक रेल्वे सुरु केल्यामुळे श्रमीकांना आपआपल्या गावी जाता आलं. त्यामुळे कोरोनाचा प्रसार वाढला. लॉकडाऊनच्या काळात आर्थिक हानी मोठया प्रमाणात झाली. संपूर्ण अर्थव्यवस्था लयास गेली, परंतु जिवितहानी कमी प्रमाण झाली. आपल्या अर्थव्यवस्थेची झालेली हानी भविष्यात आपल्याला भरुन काढता येईल परंतू जिवित हानी झाल्यास ती भरुन काढणे कठीण होईल. कारण मानवी भांडवल श्रमिक, संयोजक, भांडवलदार, भुमिधारक, हे संपूर्ण उत्पादनाचे घटकच नसतील तर उत्पादन कोण करणार ? म्हणून म्हणतात 'जान है तो जहान है'

**संदर्भ सुची** :–

शोधगंगा
www.worldometers.info.
CMIE (सेंटर फॉर मॉनिटरिंग इकॉनामी) चा रिपोर्ट
CII (कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री) चा रिपोर्ट
http://Mr.Vikaspedia.in/education
ब्रिटिश ब्रोकरेज फर्म बार्कलेज चा रिपोर्ट

I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 197-200
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

तक्ता कं. 1 कोविड 19 ची जागतिक आकडेवारी

| अनु.कं. | देश | बाधित | मृत्यू | बरे झालेले |
|---|---|---|---|---|
| 1 | अमेरिका | 2248328 | 120290 | 920921 |
| 2 | ब्राझिल | 965552 | 46842 | 503507 |
| 3 | रशिया | 561091 | 7660 | 313963 |
| 4 | भारत | 367000 | 12237 | 194000 |
| 5 | इंग्लड | 300469 | 42288 | .. |
| 6 | स्पेन | 292348 | 27136 | .. |
| 7 | पेरु | 240908 | 7257 | 128622 |
| 8 | इटली | 238159 | 34514 | 180544 |
| 9 | चिली | 225103 | 3841 | 186441 |
| 10 | इराण | 197647 | 9272 | 156991 |
| 11 | जर्मनी | 189565 | 8933 | 174100 |
| 12 | पाकिस्तान | 160118 | 3093 | 59215 |
| 13 | बांग्लादेश | 102292 | 1343 | 40164 |
| 14 | चीन | 83293 | 4634 | 78394 |
| 15 | जपान | 17628 | 931 | 15850 |
| 16 | श्रीलंका | 1928 | 11 | 1421 |

Source : www.worldmeters.info

लॉकडाऊन काळातील कोरोना रुग्नाची आकडेवारी

| लॉकडाऊन | कोरोना पॉजिटिव | मृत्युमुखी |
|---|---|---|
| 23 मार्च | 500 | 8 |
| 15 एप्रील | 11,933 | 392 |
| 3 मे | 39980 | 1301 |
| 15 मे | 81970 | 2649 |
| 31 मे | 173762 | 4971 |
| 15 जून | 332424 | 9520 |

Source : www.worldmeters.info